**राम नाईक**
पूर्व पेट्रोलियम मंत्री

9 शिवस्मृति, 51, जयप्रकाश नगर
गोरेगाव पूर्व, मुंबई 400 063.
दूरभाष : 022-2686 33 39, फॅक्स : 022-2686 11 33
ई मेल : ramnaik@vsnl.com

**कृपया प्रसिध्दीसाठी** **15 ऑक्टोबर 2008**

## दुबार मतदारांची नावे अजूनही मतदार यादीत कायम; पुन्हा एकदा मुंबई उपनगर जिल्हाधिका-यांचे तपासणीचे आश्वासन

**मुंबई, बुधवार :** उत्तर मुंबई लोकसभा मतदार संघाच्या मतदार यादीत 3,80,467 दुबार मतदार (Duplicate) असल्याचे पुरावे देऊन साडेचार महिने होऊनही अद्यापही ही नावे वगळण्यात आली नसल्याचे 8 ऑक्टोबर रोजी प्रसिध्द झालेल्या अंतिम मतदार यादीवरुन स्पष्ट झाले आहे. याबाबत तक्रार केली असता पुन्हा एकदा मुंबई उपनगर जिल्हयाचे जिल्हाधिकारी व मुख्य मतदार नोंदणी अधिकारी श्री. विश्वास पाटील यांनी तपासणीचे आश्वासन दिले आहे, अशी माहिती माजी पेट्रोलियम मंत्री श्री. राम नाईक यांनी दिली आहे.

पुनर्रचनेच्या अगोदरच्या उत्तर मुंबई लोकसभा मतदार संघातील तीन विधानसभा - मालाड, कांदिवली व बोरीवलीच्या मतदार याद्यांमध्ये 3,80,467 मतदारांची नावे दुबार असल्याचे लक्षात आले होते. दुबार मतदारांची संपूर्ण यादी भारतीय जनता पार्टी, उत्तर मुंबईने देशाच्या मुख्य निर्वाचन आयुक्तांना सादर केली होती. त्यांच्या सूचनेवरुन ही यादी महाराष्ट्राचे मुख्य निवडणूक आयुक्त श्री. देवाशिष चक्रवर्ती यांच्याकडेही सोपवण्यात आली होती. देशाचे मुख्य निर्वाचन आयुक्त श्री. एन. गोपालस्वामी यांनी दुबार मतदारांची चौकशी करुन त्यानंतर 30 जुलै रोजी मतदार यादीचे प्रारुप प्रसिध्द होईल असे सांगितले होते. तथापि, या संदर्भात कोणतीही प्रत्यक्ष कारवाई झाली नसल्याचे अंतिम मतदार यादीवरुन स्पष्ट झाले आहे, अशी टीका श्री. नाईक यांनी केली आहे. पुनर्रचित उत्तर मुंबई लोकसभा मतदार संघाच्या अंतिम मतदार यादीतील मतदारांची नावे उत्तर मुंबईतील सहा विधानसभांच्या मतदार यादीमध्ये पडताळल्यानंतरही त्यात 33,442 दुबार मतदार आढळून आले आहेत. अवघ्या सहा विधानसभा क्षेत्रांमध्ये पडताळणी केल्यानंतर 33 हजारांहून अधिक दुबार मतदार आहेत, तर पूर्वीप्रमाणे सदर यादी संपूर्ण मुंबई व ठाण्याच्या विधानसभा मतदार संघांशी पडताळली तर किती दुबार मतदार आढळतील याची कल्पनाच केलेली बरी, अशी प्रतिक्रिया श्री. नाईक यांनी व्यक्त केली आहे. आश्वासनाप्रमाणे कारवाई झालेली नाही हे निदर्शनास आणून देण्यासाठी तसेच निदान आता निवडणुकीपूर्वी निर्दोष यादी प्रसिध्द करण्याची विनंती करण्यासाठी श्री. राम नाईक यांच्यासह भारतीय जनता पार्टीच्या शिष्ट मंडळाने मुंबई उपनगराचे जिल्हाधिकारी व उपनगर जिल्हयाचे मुख्य मतदार नोंदणी अधिकारी श्री. पाटील यांची भेट घेतली. सदर भेटीमध्ये अद्यापही दुबार नावे शोधण्याकरीता सॉफ्टवेअर विकसित करण्याचे काम महाराष्ट्र निवडणूक आयोगामध्ये सुरुच आहे अशी धक्कादायक माहिती देऊन सदर सॉफ्टवेअर मिळताच दुबार मतदारांची नावे वगळण्याचे सुरु करु, असे आश्वासन श्री. पाटील यांनी दिले. त्यांच्या उपयोगासाठी म्हणून भारतीय जनता पार्टीच्या शिष्ट मंडळाने आपल्याकडील 33,442 मतदारांची यादी असलेली सीडी श्री. पाटील यांना दिली.

निदान आता तरी निवडणूक आयोग आपले आश्वासन पाळेल अशी आशा श्री. नाईक यांनी व्यक्त केली आहे. श्री. नाईक यांच्या सोबत शिष्ट मंडळात भाजपा जिल्हा सरचिटणीस श्री. जगदीश पटेल, श्री. प्रशांत साळुंके आदींचा समावेश होता.

**(कार्यालय सचिव)**

निवास : बी-503, लक्षचंडी अपार्टमेंट, जनरल अरुणकुमार वैद्य मार्ग, कृष्णवाटिका रास्ता, गोकुळधाम, गोरेगाव पूर्व, मुंबई 400 063 • दूरभाष : 022-2841 33 99, फॅक्स : 022-2842 33 99